# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ६१

## (सभावृत्तांत)

दिनांक – ०२/०५/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०२/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त,मा.आष्टीकर-अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोराटे, मा.राऊत,मा.कापडणीस-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी,

मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी,मा.आगळे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक १२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या दराच्या अहवालाबाबत...

विषय क्रमांक १३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५१, २५५२ दि.११/४/२०१८ दुरुस्तीबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक १४) मनपाच्या से.१० व गवळीमाथा येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे देखभाल दुरुस्ती करणेबाबत..

विषय क्रमांक १५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९३, दि.२५/४/२०१८ दुरुस्ती करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

--------

दिनांक २५/०४/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २६१४ विषय क्रमांक - १

दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पअक/२/कावि/१०/१८ दि.२४/०४/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी अंतर्गत मनपा क्षेत्रात पर्यावरण संवर्धन व संरक्षण घेणेस, देणेचे दृष्टीने GRIHA (Green Rating for Integrated Habitat Assessment) व Svagriha Small Versatile Affordable Green Rating for Integrated Habitat Assessment) ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टीम राबविणेत आलेली आहे. यासाठी कैंद्र सरकारचे Ministry of New & Renewable Energy कडून मनपास मागील वर्षी र.रु १०.०० लाखाचे पारितोषीक मिळाले असून सदरची रक्कम ही हरित इमारतीचे फायदे व प्रसार करणेसाठी मिळालेले आहे. रक्कम शासकीय अनुदान या अंतर्गत मनपा कोषागारात जमा करणेत आलेली आहे. सदर मिळालेले अनुदान GRIHA मार्फत Green Building System यासाठी उपयुक्त ठरावीत याकरीता खर्च करणे अपेक्षीत आहे. त्याअंतर्गत घ्यावयाचा उपक्रम घेणेकामी GRIHA कडील प्रस्तावाप्रमाणे टप्पा क्र.१, २ व ३ साठी अंदाजे र.रु.१०,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच मा.आयुक्त सो यांनी दि. १६/१२/२०१७ अन्वये मान्यता दिलेली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२६१५ विषय क्रमांक - २
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ– मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/२८८/२०१८ दि.२१/०४/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ब क्षेत्रिय कार्यालय, आरोग्य विभागाकडील संपूर्ण परिसरातील औष्णीक धुरीकरण कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेल रिक्षा टेम्पो (वाहनचालकासह) भाड्याने घेणेबाबत कामकाजासाठी निविदा नोटीस क्र.२/२०१७-१८ निविदा र.रू.६,८०,०००/- (अक्षरी र.रू.सहा लाख ऐंशी हजार फक्त) करीता मे.मनिष असोसिएटस यांचा ७५०/- हा दर सर्वात लघुत्तम असल्याने स्विकारणेबाबत क्षेत्रिय अधिकारी यांनी दि.२३/०२/२०१८ चे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.मनिष असोसिएटस यांना इकडील क्र.बक्षेआ/५/कावि/२७८/२०१८ दि.१८/०४/१७ अन्वये करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१६ विषय क्रमांक - ३
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/३४९/२०१८ दि.२४/४/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा सार्वत्रिक निवडणूक 2017 आचारसंहिता कक्षाकरिता आवश्यक व्हीडीओ चित्रीकरण करणेकामी को.नो.सु.क्र.34/2016-17 अन्वये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त नोटीशीमधील मे आकाश फोटो ऍन्ड व्हिडीओ शुटींग, पुणे यांचे र.रु.1,780/- प्रती दिन प्रती व्हिडीओ कॅमेरा, कॅमेरामन व सिडीसह दरानुसार पुरवठा आदेश निर्गत केला आहे. त्यानुसार मे आकाश फोटो ऍन्ड व्हिडीओ शुटींग, पुणे यांनी प्रथम बिल र.रु.3,79,140/- व द्वितीय बिल र.रु.3,57,780/- असे एकुण र.रु.7,36,920/- (अक्षरी र.रु.सात लाख छत्तीस हजार नऊशे वीस फक्त) चे झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१७ विषय क्रमांक - ४
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/स्था/कावि/७०१/२०१८ दि.२४/४/२०१८
विषय - पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदिर ते सृष्टी चौकापर्यंतचा १८.०० मी रूंद रस्त्यांचे अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१८ विषय क्रमांक - ५
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/४९२/२०१८ दि.२६/४/२०१८

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६१९ विषय क्रमांक - ६
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/३/कावि/४७/२०१८ दि.२६/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सारथी हेल्पलाईन अंतर्गत कॉल ऑपरेटर नियुक्त करणेकामी निविदा सुचना क्र.१९/२०१७-१८ चे लघुत्तम दरानुसार मे.**Tech 9 Services** या संस्थेकडून दरमहा प्रति व्यक्ती र.रु.१६,१६४/- (अक्षरी र.रु.सोळा हजार एकशे चौसष्ट फक्त) अधिक जी.एस.टी. नुसार १० कॉल ऑपरेटर नियुक्त करणेकामी येणा-या एकूण र.रु.२२,८८,८८०/- (जी.एस.टी.सह) (अक्षरी र.रू.बावीस लाख आठ्याऐंशी हजार आठशे ऐंशी फक्त) चे खर्चास व पुढील १ वर्ष कालावधीसाठी त्यांचेसोबत कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२० विषय क्रमांक - ७
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/८५/२०१८ दि.२५/०४/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मार्च २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि /८५/२०१८ दि.२५.०४.२०१८अन्वये पाठविलेला आहे. त्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२१ विषय क्रमांक - ८
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ–मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षेका/३/कावि/३२०/२०१८ दि.२५/०४/२०१८

मा.सहा.आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते १) नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२२ विषय क्रमांक - ९
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – शिक्षण मंडळ
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.शिमं/९/कावि/७०/२०१८ दि.२६/४/२०१८
विषय – शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी थंब मशिन देखभाल दुरुस्ती कामाचे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२३ | विषय क्रमांक - १०
दिनांक – ०२/०५/२०१८ | विभाग – ग क्षेत्रिय आरोग्य कार्यालय
सूचक – मा.करुणा चिंचवडे | अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गक्षेका/आ/३/कावि/२४३/२०१८ दि.२६/०४/२०१८
विषय – कचरा वाहतुक करणे व वाहतुक करणेचे कामकाजाची मुदतवाढ करणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२४ | विषय क्रमांक - ११
दिनांक – ०२/०५/२०१८ | विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय,जलनि:सारण
सूचक – मा.विकास डोळस | अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/जनि/कावि/२१/२०१८ दि.२७/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

फ क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर हे करीत आहेत.सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार निविदेचा कालावधी हा ५ वर्ष आहे. तसेच कामाचा आदेश २ वर्षासाठी घ्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल असे नमुद करणेत आलेले आहे. सदरची निविदा मा. स्थायी समिती ठराव क्र.१०७३५, दि.२१/०२/२०१५ अन्वये मंजूर केलेली असुन ठरावानुसार सदर कामाचे निविदा रक्कम रुपये १,०५,३९,९००/- साठी ४.८४% कमी या दराने म्हणजेच रक्कम रुपये १,००,२९,७६९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच फक्त एक वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. पुढील प्रत्येक वर्षासाठी मान्यता देणेकामी पुन्हा मा.स्थायी समितीची मंजुरी घेवूनच कामाचा परत करारनामा करून नंतरच वाढीव मुदत देणेत यावी याप्रमाणे निविदा अटी शर्तीमध्ये नमूद केलेले आहे. त्यानंतर मे.ठेकेदार सुरज कॉन्ट्रॅक्टर यांनी काम समाधानकारक रित्या पूर्ण केले असल्याने मा.स्थायी समितीने सदर कामास पुढील ५ वर्षापैकी दुस-या वर्षाकरिता ठराव क्र.१६५९३ दि.२८/०६/२०१६ अन्वये मुदतवाढीस मान्यता दिलेली आहे. ठेकेदार मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर यांना क्र.जनि/०२/कावि/४०५/२०१७ दि.१३/११/२०१७ अन्वये दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदत वाढ सह कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेली दि.३१/०३/२०१८ पर्यंत कालावधीची मुदत पूर्ण होत असून पुढील १ वर्षाकरिता मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. विषयांकित कामाच्या निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार तृतीय वर्षासाठी निविदा दारात १०% वाढ करून देणेची तरतुद आहे. दरम्यानच्या २ वर्षांच्या कालावधीमध्ये डिझेल व लेबरचे दर वाढले असल्याने सध्या चालू असलेले दर व निविदा भरले त्यावेळचे दर यांची तुलना करून तृतीय वर्षा करिता ५.००% जास्त या दराने ठेकेदार मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर यांना तृतीय वर्षाच्या मुदतवाढीच्याप्रस्तान्वाये

दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर कामाचे तृतीय वर्ष दि.११/०६/२०१८ रोजी संपत आहे. तसेच निविदा भरते वेळी व सद्याचे लेबर व डिझेल चे दर "प्रपत्र ब" मध्ये दर्शवले असून त्यानुसार सद्याचा निविदा स्विकृती योग्य दर ४.३५% इतका जास्त येत आहे. सदरचा वाढीव दर १०.००% पेक्षा कमी पाहता निविदा अटी व शर्ती प्रमाणे ठेकेदार यांना चतुर्थ वर्षाकरिता एक वर्ष कालावधीसाठी तृतीय वर्षापेक्षा ४.३५% जास्त दरवाढ देणेस हरकत वाटत नाही. त्यानुसार दि.०१/०४/२०१८ ते ११/०६/२०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी ठेकेदार यांना प्रस्तावा प्रमाणे मुदतवाढ देऊन येणारा खर्च रक्कम रु.१,३५,२०,६२४/- (अक्षरी र.रू.एक कोटी पस्तीस लाख वीस हजार सहाशे चौवीस फक्त) पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक -२६२५ विषय क्रमांक - १२
दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२३३/२०१८ दि.१३/०४/२०१८
विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या दराच्या अहवालाबाबत...

विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२६ विषय क्रमांक - १३
दिनांक – ०२/०५/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५१, २५५२ दि.११/४/२०१८ अन्वये, मा.स्थायी समिती ठराव क्र.२२७८,२२७९ दि.२१/२/२०१८ व ठराव क्र. २३८५, २३८६ दि.२८/०२/२०१८ रद्द करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतुक करणे या कामासाठी ८ वर्ष कालावधीसाठी नेमणुक करणेसाठी दक्षिण विभाग व उत्तर विभाग असे न करता सदर निविदा महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांप्रमाणे ८ फेरनिविदा लवकरात लवकर काढणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

कचरा गोळा करणे व वाहतुक करणे या कामासाठी १) अ व फ क्षेत्रिय कार्यालय २) ब व ड क्षेत्रिय कार्यालय ३) क व इ क्षेत्रिय कार्यालय ४) ग व ह क्षेत्रिय कार्यालय या प्रमाणे ४ फेरनिविदा त्वरीत काढण्यास मान्यता देणेत येत आहे. नवीन निविदा काढून कार्यान्वित होईपर्यंत सध्याचे कामास योग्य मुदतवाढ देवून संबंधित ठेकेदारांकडून काम व्यवस्थित चालू राहील याची काळजी व दक्षता प्रशासनाने घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२७ विषय क्रमांक - १४

दिनांक – ०२/०५/२०१८ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/वि/०४/१७३/२०१८ दि.२/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलशुद्धीकरण केंद्र, से.२३ विद्युत विभागांतर्गत विविध पंप हाऊसद्वारे संबंधित परिसरात पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी सदर पंपिंग मशिनरी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहणेसाठी मशिनरीची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स यांना निविदा नो.क्र. १२/४-२०१७-१८ अन्वये से.१० व गवळीमाथा येथील पंपिंग मशिनरीचे देखभाल दुरुस्ती करणेकामी दि.२५/१/२०१८ रोजी १२ महिने कालावधीसाठी कामाचे आदेश देणेत आलेले आहेत.

महापालिका समिती सभा ठराव क्र.८५०, दि.२०/४/२०१६ अन्वये देखभाल दुरुस्तीच्या महसूली खर्चास एकत्रित र.रु.६,००,००,०००/- ची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.४०,००,०००/- असून निविदा दर २.५% कमी आहे. निविदा खर्चाची मर्यादा र.रु.३९,००,०००/-इतकी आहे. या कामावर अंदाजे र.रु.११,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामात र.रु.२५,३६,१६६/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

दि.२२/४/२०१८ रोजी गवळीमाथा येथील मुख्य विद्युत पॅनेल जळाल्यामुळे पॅनेल बसविणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे र.रु.२२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून पाणीपुरवठा सुरळीत ठेवणेच्या दृष्टीने सदर पॅनल तातडीने बसविणे आवश्यक आहे.

सदर कामाची मुदत दि.२४/१/२०१९ पर्यंत असलेने भविष्यात से.१० व गवळीमाथा पंप हाऊस येथील देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम शिल्लक राहत नाही. त्यामुळे सदर निविदा रक्कमेस वाढीव मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब सदर कामाच्या मुळ खर्च र.रु.३९,००,०००/- अधिक वाढीव खर्च र.रु.२२,००,०००/- अशा एकूण र.रु.६१,००,०००/- रुपयाचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६२८ विषय क्रमांक - १५

दिनांक – ०२/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९३, दि.२५/४/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

भांडवली वाढ / घट - र.रु.१७,९०,६७३/-

महसुली वाढ / घट – र.रु.३१,७५,५३१/-

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१६२/२०१८
दिनांक - ०२/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.डक्षेका/नि-३/कावि/३२०/२०१८ दि.२५/०४/२०१८ विषय क्र.८ चे लगत)

(१०)

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17

(विषयपत्र क्र.डक्षेका/नि-3/कावि/३२०/2018 दि. २५/04/2018 लगत)

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | मे.विक्रम सदाशिव नाणेकर | स्थापत्य/ड प्रभाग/Prabhag/9/1/2017-2018 | प्रभाग क्र ५६ व ५७ येथे महानगरपालिकेच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता मंडप व्यवस्था पुरविणे व इतर स्थापत्य विषयक अनुषंगीक कामे करणे | 05/04/2018 | डक्षेका/03/कावि/313/2018 | 21/04/2018 | 699813 | -16.18% कमी | 586583 |
| | एकूण | - | - | - | - | - | - | - | 586583 |

सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी
ड क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

D:\Shri Ghadge IMP Data\Ganesh\स्थापत्य विभाग\Docket Civil\Docet CIVIL 7-23-4.doc